असा. क्र. ९

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, मार्च ३०, २००७/चैत्र ९, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.—** महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या कर यांवरील अधिनियम, १९७५, आणि महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . . . १४३-१४४

दिनांक ३० मार्च २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक ३० मार्च २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९७५ चा महा. १६. २००५ चा महा. ९.

**ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—



[किंमत : रुपये ९.००]

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.

## प्रकरण दोन

## महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये सुधारणा.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याच्या कलम ७ मध्ये, पोट-कलम (३) मधील पहिल्या परंतुकामध्ये " १ एप्रिल २००७ " या मजकुराऐवजी, " १ एप्रिल २००८ " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९७५ चा महा. १६.

## प्रकरण तीन

## महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ यामध्ये सुधारणा.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ९६ ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याच्या कलम ९६ मध्ये, पोट-कलम (१) मधील खंड (क) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल आणि तो दिनांक १ एप्रिल २००५ पासून समाविष्ट करण्यात आला असल्याचे मानण्यात येईल :— २००५ चा महा. ९.

" (क-१) ३१ मार्च २००४ रोजी किंवा त्यापूर्वी संपणाऱ्या कोणत्याही वर्षाशी संबंधित सर्व विवरणपत्रे, लायसनप्राप्त व्यापाऱ्याने ३० सप्टेंबर २००४ रोजी किंवा त्यापूर्वी दाखल केली असतील आणि मुंबई मोटार स्पिरिट विक्री कराधान अधिनियम, १९५८ याच्या कलम ६ च्या पोट-कलम (३) किंवा (४) अन्वये, ३१ मार्च २००७ पूर्वी निर्धारण आदेश काढण्यात आला नसेल तर, समाहारक ३१ मार्च २००८ पूर्वी तसा निर्धारण आदेश काढू शकेल. ". १९५८ चा मुंबई ६६.